महाराष्ट्र शासन
**उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज यांचे कार्यालय**
शामराव बंडोजी पाटील दुय्यम बाजार आवार, स्टेट बँकेच्या मागे, शिवाजी रोड,मिरज
फोन नं. 0233-2223118
Email- drcsmiraj@rediffmail.com

---

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

२०६१ जाक्र/उनिमि/ निवडणूक / का.क.७७ अ/सन २०१७
दिनांक – ४/१/२०१८

वाचले क्र

१ . महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ

२. या कार्यालयाची जा.क्र १५६५ /उनिमि/निवडणूक शाखा/ का.क.७३ आय (२)/नोटीस/सन २०१७ दि.७/११/२०१७ रोजीची सुनावणी नोटीस

ज्याअर्थी श्री सिध्दीविनायक ब्लॉसम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या सांगली ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करणेत आलेली सहकारी संस्था असुन संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व संस्था उपविधीनुसार चालविणे संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७३ आय (१) मधील तरतुदीनुसार आपल्या संस्थेचे संचालक मंडळाने समितीची मुदत संपण्यापुर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७३ कब(१४) अन्वये संस्थेची निवडणूक घेण्यासाठी या कार्यालयास कळविणे संस्थेच्या समितीची जबाबदारी आहे. तथापि संस्थेने निवडणूकीसंदर्भात काहीच कळविलेले नाही.

ज्याअर्थी या कार्यालयाकडील वाचले क्र.२ अन्वये संस्थेस निवडणुक संदर्भातील नमुना ई-२ माहिती व संस्थेची अर्हता दिनांकानुसार प्रारुप मतदार यादी नमुना ई-३ या विहीत नमुन्यात सादर करणेबाबत कळविले होते. संस्थेचे संचालक मंडळ निवडणूकीद्वारे निवडून येण्याचे दृष्टीने संस्थेने कार्यवाही केलेली नाही. यावरून संस्थेची निवडणुक प्रक्रिया घेणेस संस्थेचे संचालक मंडळ निष्क्रीय व उदासिन असलेचे दिसून आले आहे.

ज्याअर्थी, उक्त संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७३ आय (१) चे उल्लंघन केल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती का करणेत येवू नये ? याबाबत वाचले क्र.२ अन्वये नोटीस देवून दि. २१/११/२०१७ रोजी सुनावणी ठेवणेत आली. परंतु सदर नोटीस इंटीमेशन देणेत आलेबाबतचा शेरा नमुद करून परत आली आहे .यावरून सदर नोटीस संस्थेने स्वीकारली नसलेचे दिसून येते.त्यामुळे सुनावणी तारखेस चेअरमन/सचिव कोणीही उपस्थित राहिले नाहीत

त्याअर्थी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असल्याने संस्थेचे कामकाज पाहणेसाठी प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक झाले असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन मी डॉ.प्र.अ.बागल उपनिबंधक सहकारी संस्था मिरज श्री सिध्दीविनायक ब्लॉसम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या सांगली या संस्थेचे कामकाज पाहणेसाठी बोगार एस.एस.सहकारी अधिकारी श्रेणी-२ अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था,मिरज यांची नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी ६ महिन्यांचा असून त्यांनी त्वरित दप्तरी चार्ज घेवून तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक ४/१/२०१८ रोजी माझी सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

( डॉ.प्र.अ.बागल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

**प्रति,**

१) सचिव श्री सिध्दीविनायक ब्लॉसम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या सांगली बापट मळयासमोर मार्केट यार्ड सांगली सि.स.नं.३४१,ता.मिरज,जि.सांगली.

२/- संस्थेचे सर्व दप्तर प्राधिकृत मंडळाचे ताब्यात देऊन केले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर कराव

२ ) बोगार एस.एस.सहकारी अधिकारी श्रेणी-२ तथा प्राधिकृत अधिकारी , श्री सिध्दीविनायक ब्लॉसम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या सांगली बापट मळयासमोर मार्केट यार्ड सांगली सि.स.नं.३४१,ता.मिरज,जि.सांगली.

२/- संस्थेचे सर्व दप्तर ताब्यात घेवून केले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) शाखाधिकारी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.सांगली शाखा – मार्केट यार्ड,सांगली

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सांगली

२) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली

उपनिबंधक

Scanned by CamScanner